-: प्रेसनोट दिनांक- २१/०५/२०२२ :-

लोकसेवक संतोष सांगडे मंडल अधिकारी आंबा, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर, व खाजगी इसम खाजगी इसम मुबारक उस्मान मुजावर, वय - ४७, रा. विशाळगड, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांचे लाच मागणीबाबत.........

---

यातील तक्रारदार यांचे वडील मयत झालेनंतर त्यांचे शेतजमीनीच्या सातबारापत्रकी त्यांचे, आई, भाऊ, बहिण यांची नावे वारसा हक्काने नोंद करून नविन सातबारा मिळणेकरीता रितसर अर्ज केलेनंतर सदरचे प्रकरण पुढील कार्यवाही करीता मंडल अधिकारी आंबा श्री संतोष सांगडे यांचेकडे गेले होते. त्यानंतर तक्रारदार मंडल अधिकारी सांगडे यांना भेटले असता मंडल अधिकारी सांगडे यांनी तक्रारदार यांची वारसा हक्काची नोंद मंजुर करून देणेसाठी त्यांचेकडे ५०००/-रू लाचेची मागणी करत असलेबाबत अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक १८/०४/२०२२ रोजी व दिनांक १९/०४/२०२२ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक मंडल अधिकारी श्री संतोष सांगडे यांनी तक्रारदार यांचे शेतजमीनीचे वारस नोंदीस मंजुरी देवुन खाजगी इसम मुबारक मुजावर यास भेटण्यास सांगीतले त्याप्रमाणे तक्रारदार हे खाजगी इसम मुजावर यांना भेटले असता मुबारक मुजावर यांनी लोकसेवक यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून खाजगी इसम मुबारक मुजावर याला आज दिनांक २१/०५/२०२२ रोजी ताब्यात घेतले आहे.

सदरबाबत तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक संतोष सांगडे मंडल अधिकारी आंबा, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर, व खाजगी इसम मुबारक उस्मान मुजावर ,रा. विशाळगड, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांचेविरुध्द शाहुवाडी पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, व मा. श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री नितीन कुंभार, पोलीस निरीक्षक, अँन्टर करप्शन ब्युरो, कोल्हापूर, स.पो.उपनिरीक्षक संजीव बंबरगेकर, पो.ना.विकास माने, पो.ना. सुनिल घोसाळकर, पो.कॉ. रूपेश माने, चा.पो.हे.कॉ. सुरज अपराध, चा.पो.हे.कॉ. विष्णु गुरव अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,
४) कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.
५)हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४
६) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner